लोकमत
# हॅलो औरंगाबाद
औरंगाबाद, मंगळवार, दि. १९ डिसेंबर २०१७




## सारांश

### मसुरीच्या प्रशिक्षणानंतर 'सीईओ' परतले

**औरंगाबाद :** एक महिन्याचे मसुरी येथील प्रशिक्षण पूर्ण करून मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड यांचे आज जिल्हा परिषदेत आगमन झाले. सकाळी कार्यालयीन वेळेत ते जिल्हा परिषदेत आले. विविध अभ्यागतांना भेटल्यानंतर दुपारपर्यंत त्यांनी विविध फायलींचा निपटारा केला व नंतर ते जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीला गेले. उद्या त्यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषदेचा जिल्हा शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळा पार पडणार आहे.

### राज्यातील ३२ शिक्षकांना जीवनगौरव पुरस्कार

**औरंगाबाद :** बोधी ट्री फाऊंडेशन व जीवनगौरव सार्वजनिक वाचनालयाच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील ३२ शिक्षकांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. येत्या ७ जानेवारी रोजी जीवनगौरव मासिकाचा दुसरा वर्धापन दिन असून, महसूल प्रबोधिनीमध्ये दोन सत्रांमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, असे या कार्यक्रमाचे संयोजक रामदास वाघमारे यांनी कळविले आहे.

### एस. टी. चालकाची गळफास घेऊन आत्महत्या

**औरंगाबाद :** सहा महिन्यांपासून कर्तव्यावर नसलेल्या एस. टी. महामंडळातील बसचालकाने रविवारी रात्री गजानननगर येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. देवीदास श्यामा राठोड (५२) असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की, देवीदास यांनी रविवारी रात्री कुटुंबासोबत जेवण केले. यानंतर ते गच्चीवर झोपण्यासाठी गेले. नंतर त्यांनी जिन्याच्या टॉवरच्या लोखंडी आढ्याला साडीने बांधून गळफास घेतला. त्यानंतर त्यांना घाटीत दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. पोहेकॉ एकनाथ चव्हाण तपास करीत आहेत.

**मनपा सभा :** राहुल गांधी यांच्या अभिनंदन ठरावास अनुमोदन

# सेनेचा भाजपवर 'बाण'

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** शिवसेना-भाजपमधील सुंदोपसुंदी कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. दोन्ही पक्ष एकमेकांवर कुरघोडी करण्याची कोणतीच संधी सोडत नाहीत. सोमवारी महापालिकेच्या सर्वोच्च सभागृहातही सेनेने भाजपवर राजकीय 'बाण' सोडला. हा बाण भाजपच्या एवढा जिव्हारी लागला की, सेनेला प्रत्युत्तरही देण्यासाठी भाजपकडे शब्द नव्हते.

त्याचे झाले असे की, सोमवारी सकाळी ११.३० वाजता महापालिकेची सर्वसाधारण सभा सुरू होताच भाजपने गुजरात, हिमाचल प्रदेशात मिळालेल्या यशाबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. काँग्रेसचे गटनेते भाऊसाहेब जगताप यांनी राहुल गांधी अध्यक्ष झाल्याबद्दल त्यांच्याही अभिनंदनाचा ठराव मांडला. गोंधळात जगताप यांच्या ठरावाकडे क्षणभर दुर्लक्ष झाले. काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक अफसर खान यांनी निवडणूक निकाल पूर्णपणे येऊ तरी द्या, असा सल्ला भाजपच्या सदस्यांना दिला. त्याकडेही भाजप नगरसेवकांनी दुर्लक्ष करून पंतप्रधान, पक्षाध्यक्ष, प्रदेशाध्यक्ष यांचे अभिनंदन करा, असा आग्रह धरला. माजी स्थायी समिती सभापती दिलीप थोरात यांनी फुलंब्री नगराध्यक्ष निवडणुकीत भाजपला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल अभिनंदन करावे असे नमूद केले. भाजपचा हा गवगवा (पान २ वर)

### हे नवीन नाही...

- महापालिकेच्या राजकारणात शिवसेनेकडे सर्वाधिक सदस्य आहेत. त्यापाठोपाठ भाजपकडे आहेत. मनपाच्या सत्तेत सेना-भाजप युतीमध्ये आहे. मात्र, मागील काही वर्षांमध्ये दोन्ही पक्षांनी एकमेकांवर कुरघोडी करण्याची कोणतीच संधी सोडलेली नाही. सोमवारीही भाजपला कोंडीत पकडण्यासाठी सेनेने 'ऐनवेळी'परिपूर्ण खेळी केली, हे विशेष.

### खैरे यांची भविष्यवाणी...

मागील आठवड्यातच खा. चंद्रकांत खैरे यांनी फुलंब्री नगराध्यक्ष निवडणुकीत येणाऱ्या काही दिवसात राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे संकेत दिले होते.



औरंगाबाद महापालिकेत सध्या सेनेचे आणि खैरे यांचे अत्यंत विश्वासू महापौर आहेत. सोमवारी महापालिकेच्या राजकीयपटलावर सेनेने चक्क राहुल गांधी यांच्या अभिनंदन ठरावाला अनुमोदन देऊन खैरे यांची भविष्यवाणी खरी ठरविली.

आतिश वानखेडे



**भाजपचा जल्लोष...** गुजरात आणि हिमाचल प्रदेश राज्यांत भाजपची सत्ता आल्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी गुलमंडीवर जोरदार जल्लोष केला. महिला आयोगाच्या राष्ट्रीय अध्यक्षा विजया रहाटकर, आ. अतुल सावे, माजी केंद्रीय राज्यमंत्री जयसिंगराव गायकवाड, शहराध्यक्ष किशनचंद तनवाणी, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा मनीषा भन्साळी, उपमहापौर विजय औताडे, मनपातील पक्षाचे गटनेते प्रमोद राठोड, प्रशांत देसरडा, नगरसेवक कचरू घोडके, माजी नगरसेवक दामूअण्णा शिंदे आदी. (वृत्त पान २ )

# अतिक्रमणांवर नगरसेवक आक्रमक

**आरोप-प्रत्यारोप :** एमआयएमला अधिक झोंबले

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सर्वपक्षीय नगरसेवकांनी रस्त्यांवरील अतिक्रमणांच्या होणाऱ्या त्रासाबद्दल आक्रमकपणे व्यथा मांडल्या. काही ठिकाणी वैयक्तिक हितापोटी आणि राजकीय दबावापोटी अतिक्रमणे काढण्यात येत असल्याचा जोरदार आरोप नगरसेवक राजेंद्र जंजाळ यांनी उपस्थित केला. त्यांचा हा आरोप एमआयएमचे विरोधी पक्षनेते फेरोज खान यांच्या बराच जिव्हारी लागला. कारण फेरोज खान यांनी आपल्या वॉर्डातील अतिक्रमण अलीकडेच काढले आहे.

सोमवारी मनपाच्या सर्वसाधारण सभेत दमडी महल येथील अतिक्रमणावरून एमआयएम नगरसेवकांनी रौद्र रूप धारण केले होते. काही नगरसेवकांनी (पान २ वर)

### 'त्या' निविदांचे काय?

- २० दिवस झाले तरी १५० कोटींची निविदा प्रक्रियाच सुरु आहे. ही प्रक्रिया लवकर संपवून वर्कऑर्डर द्या, असा आग्रह महापौरांसह नगरसेवकांनी सोमवारी सर्वसाधारण सभेत धरला. लक्ष्मण चावडी ते एमजीएम रस्त्याची निविदाही लवकरात लवकर अंतिम करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. २३ जानेवारी रोजी किमान ५ बसेस सुरु करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचे आदेश प्रभारी आयुक्तांनी दिले.

### पोलीस नियंत्रण कक्ष समर्थनगर चौकात



**स्थलांतर...** पोलीस आयुक्तालयाच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. अलंकार हॉलमध्ये कार्यरत असलेले शहर पोलीस नियंत्रण कक्ष, आर्थिक गुन्हे शाखा, वाचक शाखा, तक्रार शाखा कार्यालयाचे स्थलांतर सोमवारी समर्थनगर येथील सावरकर चौकालगतच्या किरायाच्या इमारतीत करण्यात आले. एका जुन्या बंगल्यात पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली धाटे यांचे कार्यालय आहे. या कार्यालयासह विशेष शाखेचे सहायक आयुक्त आणि विशेष शाखा, सुरक्षा शाखेचे कार्यालय आठवड्यात स्थलांतरित केले जाणार आहे. आयुक्तालयाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत समर्थनगर येथूनच कामकाज चालणार आहे.

# पीएच.डी.च्या नोंदणीला मुदतवाढ

**विद्यापीठ :** प्रशासनाने घेतला निर्णय; पीएच.डी.चा गोंधळ सुरुच

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मागील वर्षी जुलै महिन्यात मागविलेल्या पेट-४ अर्जानंतर परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेच्या निकालास चार महिने उलटून गेल्यानंतर 'आरआरसी' समितीसमोर संशोधनाचा विषय सादर करण्यासाठी अर्ज मागविण्यास सुरुवात केली होती. हे अर्ज दाखल करण्याचा सोमवार (दि.१८) शेवटचा दिवस होता. यास आता ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.

विद्यापीठाने पीएच.डी.चे संशोधन करण्यासाठी प्रवेश परीक्षा (पेट-४) घेण्यासाठी मागील वर्षी ३० जुलै २०१६ रोजी अर्ज मागवण्यास सुरुवात केली होती. यानंतर परीक्षा ऑनलाईन घ्यायची की ऑफलाईन या घोळामध्ये वर्ष उलटून गेले. शेवटी पेट-४ ची ऑनलाईन परीक्षा १४ व १५ जुलै रोजी घेण्यात आली. या परीक्षेतही निगेटिव्ह गुणांकन पद्धतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड रोष होता. या रोषापुढे (पान २ वर)

### सम्यक विद्यार्थी आंदोलनचे प्रयत्न

- अनेक विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी अडचणी निर्माण झालेल्या आहेत. यात अनेकांना मार्गदर्शक मिळत नाही. मार्गदर्शकांच्या आभावामुळे संशोधन विषय निवडण्यासाठीही विद्यार्थ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे सम्यक विद्यार्थी आंदोलनचे जिल्हाध्यक्ष प्रकाश इंगळे यांनी प्रशासनाला निवेदन देत नोंदणीस मुदतवाढ देण्याची मागणी केली. ही मागणी प्रशासनाने मान्य केली आहे.

### पीएच.डी. मार्गदर्शकांचा तिढा सुटेना

विद्यापीठात कोणत्या विषयांचे किती मार्गदर्शक आहेत. त्यांच्याकडे रिक्त जागांचे प्रमाण, मार्गदर्शक होण्यास पात्र असलेल्या प्राध्यापकांच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यात आलेले नाहीत.

अनेक मार्गदर्शकांकडे जागा रिक्त नसताना विद्यापीठाच्या वेबसाईटवर जागा दाखविण्यात आलेल्या आहेत.

यामुळे पीएच.डी.साठी इच्छुक विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. हे वातावरण दूर करण्यासाठी नियोजनबद्ध तयारी करण्याची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

# तीन महिन्यांनंतर खुनाचा उलगडा

**चौघांना अटक :** वहिनीवर वाईट नजर असल्याच्या संशयावरून केली चौघांनी हत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** तीन महिन्यांपूर्वी सुखना नदीपात्रात दुचाकीसह मृतावस्थेत आढळलेल्या तरुणाची चौघांनी हत्या केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. वहिनीवर वाईट नजर असल्याच्या संशयावरून चार जणांनी तरुणाच्या डोक्यात धारदार कोयत्याने आणि कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याप्रकरणी गुन्हे शाखा पोलिसांनी चार तरुणांना अटक केली.

नारायण रतन गरंडवाल (२५), समाधान गणेश कालभिले (२३), राजू तुळशीराम पवार (२१) आणि सुनील गणेश घोगरे (२१, सर्व रा.जुना चिकलठाणा बायपास रोड परिसर) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. तर कृष्णा एकनाथ कोरडे (२२, रा. जुना चिकलठाणा) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त रामेश्वर थोरात म्हणाले की, मृत आणि आरोपी एकाच एरियामधील रहिवासी आहेत. मृत हा स्पर्धा परीक्षेची तयारी करायचा. वहिनीवर कृष्णाची वाईट नजर असल्याचा संशय नारायणच्या भावाला होता. यावरून त्याच्या भावासोबत जुलै महिन्यात भांडणही झाले होते. ही बाब नारायणला माहीत झाल्याने त्याने कृष्णाचा काटा काढण्यासाठी तीन मित्रांच्या मदतीने कट रचला. कटानुसार १५ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजेच्या सुमारास नारायण हा कृष्णाला जेवण करण्याच्या बहाण्याने एका हॉटेलवर घेऊन गेला. तेथे दोघांनी एकत्र मद्य प्राशन केल्यानंतर जेवण केले. यानंतर कृष्णाच्या मागे दुचाकीवर बसून ते घरी जात असताना सुखना नदीच्या काठावर लघुशंकेच्या बहाण्याने दुचाकी थांबविली. यावेळी नारायणने अन्य आरोपींना फोन करून बोलावून घेतले. यावेळी नारायणने कृष्णाशी वाद उकरून काढून भांडण सुरू केले. यावेळी कृष्णाने नारायणची कॉलर पकडताच आधीच तेथे लपून बसलेल्या अन्य आरोपींनी धारदार कोयत्याने आणि कुऱ्हाडीने त्याच्या डोक्यावर वार करून त्याचा खून केला. त्यावेळी सुखना नदीला पूर आलेला होता.

यावेळी आरोपींनी कृष्णाला दुचाकीसह नदीत ढकलून दिले. यानंतर ते तेथून पसार झाले. दुसऱ्या दिवशी कृष्णाचे प्रेत आणि दुचाकी नदीपात्रात आढळली होती. याप्रकरणी एमआयडीसी ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. पुरात दुचाकीसह वाहून गेल्याने कृष्णाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी पत्रकारांना दिली होती. दरम्यान याप्रकरणी मृताचा भाऊ संजय याने भावाच्या मृत्यूविषयी संशय व्यक्त करणारे पत्र गुन्हे शाखा निरीक्षक यांना दीड महिन्यापूर्वी पाठविले होते.

याप्रकरणी पो. नि. शिवाजी कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विजय जाधव, नसीम पठाण, कर्मचारी समद पठाण, प्रदीप शिंदे, रमेश भालेराव, संदीप बीडकर, भावलाल चव्हाण, रितेश जाधव यांनी आरोपीला पकडले.



नारायण गरंडवाल | समाधान कालभिले | राजू पवार | सुनील घोगरे

### मृताच्या भावाचा संशय ठरला खरा

- मृत कृष्णा कोरडे याचा भाऊ संजय कोरडे यांनी ३० ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्तांना निवेदन देऊन कृष्णाचा मृत्यू नैसर्गिक नसून घातपाताचा प्रकार असल्याचा संशय व्यक्त केला होता. घटनेच्या दिवशी आरोपी नारायणने कृष्णाला जेवण करण्यासाठी सोबत नेले होते.
- दुसऱ्या दिवशी त्याचे प्रेत सापडले. मात्र नारायण कृष्णा कोरडे यांच्या अंत्यविधीला आला नाही आणि त्याच्या घरीही गेला नव्हता. त्याच्याविषयी त्यांनी संशय व्यक्त केला होता.

### तांत्रिक पुराव्याची झाली मदत

पोलिसांनी घटनेच्या दिवशी संशयित आणि मृताच्या मोबाईल कॉल डिटेल्सची माहिती काढली. शिवाय शवविच्छेदन अहवाल वाचला. तेव्हा मृताच्या डोक्यात गंभीर घाव मारल्याने समोर आले. मृताच्या शरीरावर अन्य वरखडाही नव्हता. कृष्णाची हत्या करून तीन महिने उलटल्यानंतर पोलीस आपल्यापर्यंत येतील, अशी कोणतीही शंका मनात नसलेला नारायण बिनधास्त वावरत होता. पोलिसांनी संशयावरून नारायणला ताब्यात घेतले तेव्हा तो या घटनेशी आपला कोणताही संबंध नसल्याचा बनाव करू लागला. पोलिसांनी त्यास विश्वासात घेतल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि अन्य तीन मित्रांच्या मदतीने कट रचून कृष्णाची हत्या केल्याचे सांगितले. नंतर अन्य आरोपींना पोलिसांनी उचलले.

**घाटीत उपचार :** डॉक्टरही चक्रावले, सव्वालाखात आढळतो एखादा रुग्ण

# दुर्मिळ आजाराने हात, डोळे पडले निळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** घाटी रुग्णालयातील औषधवैद्यकशास्त्र (मेडिसीन) विभागात दाखल एका रुग्णाला पाहून डॉक्टरही चक्रावून गेले आहेत. हात आणि डोळे निळे पडलेल्या या रुग्णाला काळ्या रंगाची लघवी होते. पायाच्या सांध्यांतून आवाजही होतो. अनुवंशिक असलेला हा आजार सव्वालाख लोकांमध्ये एखाद्यास होतो. घाटीतील प्रत्येक डॉक्टरसाठी हा आजार अभ्यासाचा विषय बनला आहे.

गंगापूर तालुक्यातील मुद्देशवडगाव येथील ४७ वर्षीय मच्छिंद्र भुसारे असे मेडिसीन विभागात उपचार घेत असलेल्या या रुग्णाचे नाव आहे. भुसारे यांना अल्कॅप्टोन युरिया नावाचा अतिशय दुर्मिळ आजार झाला आहे. हा आजार अनुवंशिक असून, सव्वालाखात एखाद्यास तो होत असल्याचे विभागप्रमुख डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य यांनी सांगितले. या आजारामुळे या रुग्णाच्या शरीरातील सर्व सांध्यांतील गॅप नष्ट होतो. त्यामुळे शरीराचा कोणताही भाग हलवताना हाडांचा कडकड आवाज होतो. थंडीमुळे रात्रीच्या वेळी सर्व अवयव आकुंचित होतात.

सदर रुग्णाला २००८-०९ मध्ये त्रास सुरू झाला. सुरुवातीला पाठदुखीमुळे अस्थिरोगतज्ज्ञांकडे उपचार सुरु केले. पाठीच्या मणक्याची शस्त्रक्रियादेखील झालेली आहे; परंतु आराम मिळत नसल्याने विविध ठिकाणी उपचार घेतले. आता घाटी रुग्णालयातील डॉक्टरांनी या दुर्मिळ आजाराचे निदान केले. हा आजार अनुवंशिक असल्याने रुग्णांच्या कुटुंबातील सदस्यांना तपासणी करून घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. डॉ. भट्टाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. खलील अहेमद, डॉ. सुदाम लगास, डॉ. संदेश मालू यांच्यासह वॉर्ड क्रमांक १ आणि ५ मधील नर्सिंगचे कर्मचारी रुग्णांच्या उपचारासाठी परिश्रम घेत आहेत.



उपचार सुरु असलेल्या रुग्णाचे हात अशाप्रकारे निळे पडले आहेत.

### २५ वर्षांत पहिला रुग्ण



डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य

- अशा प्रकारचा रुग्ण मी २० ते २५ वर्षांच्या करिअरमध्ये पहिल्यांदाच पाहिला आहे. दोन सांध्यांमध्ये गॅप असतो, त्यामुळे त्यांच्या सर्व क्रिया अतिशय सहज होतात; परंतु या आजाराने रुग्णाच्या शरीरातील सर्व सांध्यांतील गॅप नष्ट होतो. त्यामुळे शरीराचा कोणताही भाग हलवला की हाडांचा कडकड आवाज येतो.

**-डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य,** विभागप्रमुख, औषधवैद्यकशाास्त्र विभाग, घाटी

